# सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सिंधुदुर्ग

प्रधान कार्यालय, सिंधुदुर्गनगरी

फोन नं. ०२३६२- २२९००५ ते २२९०१० ई मेल - sindhudurgdcc@gmail.com


जा.क्र. कर्ज/९९९/३१/एनआरएलएम/**३९७९**/२०१३-१४ दि. २८/०१/२०१४

## -: परिपत्रक १९ :-

**विषय** - राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान (NRLM) योजनेच्या अंमलबजावणी करणेबाबत.

केंद्र शासनाच्या ग्राम विकास विभागाने गरीबांचे दारिद्रय कमी करून त्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी १९७८ मध्ये एकात्मिक ग्रामीण विकास योजना (DRDA) अंमलबजावणी सुरू केली. त्यानंतर सदर योजनेमध्ये सुधारणा करून १९९९ मध्ये 'कौशल वृध्दी, पतकर्ज व अर्थसहाय्याच्या आधारावर स्वर्ण जयंती ग्रम स्वरोजगार योजना (SGSY) राबविण्यात आली. सदर योजना वैयक्तिक स्वरोजगारी व गटांद्वारे राबविण्यात आली. स्वरोजगारांचे स्वयं. गट करण्यास प्राधान्य देवून त्यांना प्रशिक्षण, अनुदान, मुलभूत सुविधा व बँकेकडून कर्ज देवून त्यांना उपक्रम सुरू करणेस उद्युक्त करणे. जेणेकरून कुटुंबाचे मासिक उत्पन्न रू. २०,०००/- चे वर होवून ते दारिद्रय रेषेवर येतील अशी संकल्पना होती. सदर योजनेचे मूल्यमापन केल्यानंतर सदर योजना काही अंशी यशस्वी ठरली तरी अजूनही मोठया प्रमाणावर दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे सक्षमीकरण करून त्यांना आर्थिक कार्यक्रमाद्वारे सातत्यपूर्ण उत्पन्न प्राप्त होणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आल्यानंतर नव्याने राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान (National Rural Livelihoods Mission [NRLM]) योजना राबविण्याचा निर्णय शासनाने दि. ११ ऑक्टो. २०१३ न्वये बँकांना कळविला आहे. याबाबत मा. संचालक मंडळ सभा दि. २८.०१.२०१४ मधील निर्णयानुसार सदरची योजना खालीलप्रमाणे आपल्या बँकेमार्फत राबविण्याचे ठरविण्यात आले आहे.

या योजनेद्वारे ज्या महिला गटांचे ७०% सदस्य दारिद्रय रेषेखाली आहेत, अशाच बचतगटांना फिरता निधी, व्याज अनुदान व कर्ज सुविधा उपलब्ध होणार आहे. मात्र कोणत्याही प्रकारचे भांडवली अनुदान उपलब्ध होणार नाही.

### १. अनुदान बाबी -

| अ.क्र. | अनुदानाच्या बाबी | मर्यादा | ठळक बाबी |
|---|---|---|---|
| ०१ | फिरता निधी | रू. १० ते १५ हजार पर्यंत | स्वयं. बचतगटांना प्रथम श्रेणीकरण करणानंतर प्राप्त गुणानुसार अनुज्ञेय. |
| ०२ | व्याज अनुदान | रू. ३ लाख पर्यंत कर्ज रक्कमेवर (दारिद्रय रेषेखालील किमान ७०% महिलांच्या गटांना) | केंद्र शासनाकडून स्वयं. बचतगटांना बँक कर्ज व्याजदर व ७% व्याजदर यातील तफावती एवढे व्याज अनुदान देय. (सद्याचा आपल्या बँकेचा व्याजदर १०.५% आहे.) |
| ०३ | समूह बांधणी निधी | रू. १०,०००/- | SHG क्षमता बांधणी व बँक जोडणी निधी |
| ०४ | क्षमता बांधणी निधी | रू. ७,५००/- | प्रति व्यक्ति प्रती वर्षी |
| ०५ | भांडवली अनुदान | भांडवली अनुदान कार्यपध्दती बंद करण्यात आलेली आहे. | |

### २. बँक कर्ज पुरवठा -

बँकेकडून बचतगटांना खालीलप्रमाणे कर्ज पुरवठा करावयाचा आहे.

| अ.क्र | अर्थसहाय्य | श्रेणीकरण | मर्यादा | परतफेड कालावधी |
|---|---|---|---|---|
| ०१ | पहिले कर्ज | गटाच्या द्वितीय श्रेणीनंतर | बचतीच्या ४ ते ८ पट किंवा रू. ५०,०००/- यापैकी जास्त असणारी रक्कम | ६ ते १२ महिने |
| ०२ | दुसरे कर्ज | पहिले कर्ज परतफेड करणाऱ्या गटांना | बचतीच्या ५ ते १० पट किंवा रू. १,००,०००/- यापैकी जास्त असणारी रक्कम | १२ ते २४ महिने |
| ०३ | तिसरे कर्ज | गटाच्या प्रकल्प आराखडयानुसार | प्रकल्प किंमतीनुसार किंवा रू. २ ते ५ लाख रक्कमेएवढे, दुसऱ्या कर्जाची ९०% पेक्षा जास्त कर्ज परतफेड केल्यानंतर | २ ते ५ वर्ष |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०४ | चौथे कर्ज | गटाच्या प्रकल्प आराखडयानुसार | प्रकल्प किंमतीनुसार किंवा रू. ५ ते १० लाख रक्कमेएवढे, तिसऱ्या कर्जाची ९०% पेक्षा जास्त कर्ज परतफेड केल्यानंतर | ३ ते ६ वर्ष |

**३. तारण व्यवस्था –**

स्वयंसहाय्यता बचतगटांना रू. १.०० लाख पर्यंतचे कर्ज गटातील सभासदांच्या वैयक्तिक हमीपत्रावर दिले जाईल. रू. १.०० लाखावरील बँक कर्जाच्या बाबतीत ज्या ठिकाणी कर्जातून असेट्स ज्या किंमतीची निर्माण होईल त्यासाठी स्थावर तारण आवश्यक नाही. मात्र उर्वरित कर्जासाठी तारण आवश्यक राहील. बचतगटांच्या बाबतीत दुग्ध व्यवसाय अगर ज्याठिकाणी स्थावर मालमत्ता (Fixed Assets) निर्माण होतील त्याठिकाणी तारणाची अट शिथील राहील. मात्र अन्य कारणासाठी किमान कर्ज रक्कमेएवढ्या किंमतीचे गटप्रमुख/ अन्य सदस्य / जामीनदारांचे क्षेत्र किंवा घर रू. १००/– च्या बॉण्डपेपरवरील तारणगहाणखताने तारण घेणे आवश्यक राहील. घर शासकीय अनुदानातून बांधलेले असल्यास ते तारण घेतले जाणार नाही. (उदा. इंदिरा आवास घरकुल योजना इ.) घर तारण घेताना घराच्या असेसमेंट उताऱ्यावर बँक कर्ज बोजा नोंद निर्माण करून दिल्यानंतरच कर्ज उचल दिली जाईल. नक्त कर्ज रू. ५.०० लाख वरील कर्जासाठी रजिस्टर्ड तारण गहाणखताने मालमत्ता तारण देणे आवश्यक राहील.

**४. प्रकल्प अंमलबजावणी –**

सदर प्रकल्पाची अंमलबजावणी पूर्वीप्रमाणेच जि.प द्वारे डि.आर.डी.ए कडून केली जाणार आहे. या संदर्भातील महाराष्ट्र शासनाकडील दि. ११.१०.२०१३ च्या शासन निर्णयाची प्रत सोबत जोडलेली आहे ती अभ्यासावी. सदर आदेशामध्ये नमूद केलेल्या सूचना विचारात घेवून (तारण मुद्दा वगळून) योजनेची अंमलबजावणी करावयाची आहे.

यापूर्वी SGSY योजनेंतर्गत वितरीत केल्या जाणाऱ्या कर्जाप्रमाणेच या योजनेची अंमलबजावणी बँकेने करावयाची असून, पूर्वीप्रमाणे डॉक्युमेंट व अन्य कागदपत्र घ्यावयाची आहेत. व्याज अनुदान क्लेमच्या बाबतीत शासनाकडून वेळोवेळी केल्या जाणाऱ्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

**५. कर्ज कोड नंबर –**

सदरच्या NRLM योजनेसाठी खालीलप्रमाणे जनरल लेजर कोड (Product Code) राहतील.

| | | |
|---|---|---|
| i. | ST TO SHG NRLM (INDL) | 16607 |
| ii. | ST TO SHG NRLM THROUGH STY | 16208 |
| iii. | MT TO SHG NRLM (INDL) | 19823 |
| iv. | MT TO SHG NRLM THROUGH STY | 19323 |

सदर परिपत्रक सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणावे.